ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-4

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S). India

Young Researcher Association

Scanned with CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue4. Mar-Apr-2022

CONTENTS


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | नविन शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षण<br>डॉ. दिपक गुमान कांबळे | 1-4 |
| 2 | शाश्वत शेतीचे बदलते स्वरूप<br>प्रा. सिमा विनोद गुंजाळ | 5-9 |
| 3 | हवामान बदलाचे भारतीय शेतीवरील परिणाम<br>प्रा.राजेंद्र बाबुराव मिठारी | 10-12 |
| 4 | भारतीय कृषी क्षेत्र आणि हवामान बदल<br>प्रा.डॉ.शर्वरी कुलकर्णी | 13-15 |
| 5 | नैतिकता आणि नैतिकतेचे प्रश्न<br>डॉ. सुनीलदत्त एस. गवरे | 16-19 |
| 6 | संप्रेषणात नैतिकतेची भूमिका<br>प्रा. डॉ. सुनील व. मोटे | 20-24 |
| 7 | निवडणूक प्रक्रियेतील बदल आणि आव्हाने<br>प्रा.डॉ.करीम नबी मुल्ला | 25-27 |
| 8 | महिलांच्या सामाजिक सुधारणा<br>डॉ. मनीषा शिवाजी चव्हाण | 28-30 |
| 9 | एक उपेक्षित समाजसुधारक : हमीद दलवाई<br>श्रीमती मुलाणी एस.पी. | 31-33 |
| 10 | महिला समाज सुधारक<br>निलम हरिभाऊ देवकात | 34-36 |
| 11 | कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष<br>प्रसाद पांडुरंग दावणे | 37-40 |
| 12 | संप्रेक्षण (संवाद)कौशल्यातील नीतिशास्त्राची भूमिका :बुद्धांची 'सम्यक वाक्' शिकवण<br>प्रा. डॉ अमन बगाडे | 41-44 |
| 13 | भारतीय संघराज्य पद्धतीत लोकसंख्या रजिस्टर (NPR) आणि नागरिकांचे रजिस्टर (NRC) संदर्भात केंद्र-राज्य संबंध<br>डॉ.विजय जालिंदर देठे | 45-48 |
| 14 | सत्याग्रह तत्वज्ञान<br>डॉ. मल्लिकार्जुन महादेव बंदारे | 49-53 |
| 15 | पंडित नेहरूंचा राष्ट्रवाद आणि भारतीय लोकशाही<br>श्री नागनाथ महादेव धोबे | 54-56 |
| 16 | भारतीय संघराज्यातील नवे प्रवाह व समस्या<br>डॉ खंडेराव ज्ञानदेव खळदकर | 57-60 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे केंद्र-राज्य संबंधाबाबत विचारांचा अभ्यास<br>श्री दत्तात्रय दादा खिलारे | 61-63 |




Scanned with CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.4 Mar-Apr- 2022

# निवडणूक प्रक्रियेतील बदल आणि आव्हाने

प्रा.डॉ.करीम नबी मुल्ला
राज्यशास्त्र विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,कोल्हापूर
karimmulla78@gmail.com

**प्रस्तावना :**

लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजकीय प्रक्रियेतील सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो यासाठी नागरिकांना काही घटनात्मक राजकीय अधिकारांची आवश्यकता असते. लोकशाही व्यवस्थेच्या मुळाशी व्यक्ती हित जपण्यासाठी मतदानाचा हक्क समानतेने प्रदान केला जातो. या राजकीय हक्कांची परिपूर्तता करण्यासाठी संविधानाने स्वतंत्र, निष्पक्ष निवडणूक आयोगाची तरतूद केलेली दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात मताधिकार, निवडणुकीतील मतदान प्रक्रिया, त्यामधील बदल आणि आव्हाने, तसेच उपाययोजना आदी.घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्या निवडणुकीपासून ते आज पर्यंत निवडणूक प्रक्रियेत झालेले अमुलाग्र बदल अभ्यासले आहेत. दिवसेंदिवस या प्रक्रियेत अधिक सुलभता, निष्पक्षपातीपणा निर्माण होण्यासाठी निवडणूक आयोगाने केलेले प्रयत्न अभ्यासले आहेत. प्रस्तुत शोधनिबंध साठी प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ, निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ, दैनिकातील लेख आदी. प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेऊन शोधनिबंधाची सूत्रबद्ध पद्धतीने मांडणी केली आहे.

**मताधिकाराचे स्वरूप :** भारतीय लोकशाही प्रातिनिधिक लोकशाही आहे. भारतात समान तसेच विरोधी हितसंबंध लोकांचे अनेक गट आहेत. राज्यकारभार पूर्ण सहमती च्या आधारे किंवा एक मताने चालणे शक्य नाही, म्हणून लोकांना आपल्या इच्छा-आकांक्षा आणि हितसंबंध आपल्या प्रतिनिधींमार्फत व्यक्त कराव्या लागतात. प्रतिनिधींची निवड करण्यासाठी मतदानाची घटनात्मक तरतूद केली आहे. भारतीय संविधानाच्या पंधराव्या प्रकरणातील कलम 326 मध्ये मताधिकाराबाबत स्पष्ट तरतूद केलेली आहे. भारतीय घटनेने कोणताही भेदभाव न पाळता सुरुवातीला प्रारंभी एकवीस वर्षे पूर्ण असणाऱ्या प्रत्येक नागरिकाला हा अधिकार दिला.

**प्रारंभी काळातील निवडणूक पद्धती :** स्वतंत्र भारताने लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी, 25 जानेवारी 1950 रोजी, भारत निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. 1951 52 च्या पहिल्या लोकसभा निवडणुकीपासून आज पर्यंत निवडणूक आयोगाने अनेक लोकसभा आणि विधानसभा निवडणूका यशस्वीपणे घेत देशातील लोकशाहीचा ढाचा अबाधित ठेवला आहे. निवडणूक आयोगाच्या गेल्या सात दशकातील प्रवासात मतदार नोंदणी आणि निवडणूक प्रक्रिया यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत गेल्याचे दिसून येते. आयोगाने मुक्त आणि न्याय्य वातावरणात कालबद्ध पद्धतीने निवडणुका घेऊन लोकशाही मूल्यांना अधिक बळकटी दिलेली दिसून येते. स्वतंत्र भारत देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक घेणं हे भारत निवडणूक आयोगासमोरील अभूतपूर्व असे आव्हान होते. पूर्वानुभव नसताना एवढ्या प्रचंड लोकसंख्येसाठी निवडणुकांचे संचालन करणे आव्हानात्मक होते. सारे जग या अभुतपुर्व प्रक्रियेकडे विस्मयाने पाहत होते. निवडणूक आयोगाने हे आव्हान स्वीकारले. सन 1951-52 मध्ये लागोपाठ लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेऊन, भारतीय लोकशाहीकडे साशंकतेने पाहणाऱ्यांना विस्मयचकित केले. सुमारे 17.32 कोटी म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या एकूण 49 टक्के जनता या निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाली. यासाठी मतदार याद्या तयार करण्याचे काम अतिशय आव्हानात्मक होते. 8 जानेवारी 1949 रोजी सुरू झालेली मतदार याद्या पुनरिक्षण (अद्ययावतीकरण) प्रक्रिया आजतागायत सुरू असून, ही प्रक्रिया युवा पिढीला निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हायला सक्षम करते. आजच्या काळामध्ये बदलत्या तंत्रज्ञानाचा आधार घेऊन ऑनलाइन पद्धतीने सुद्धा 18 वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तीस आपले नाव
प्रत्यक्षात्या मतदार यादीत समाविष्ट करता येते, तसेच त्यामध्ये बदल करता येतो.

**निवडणुकीतील बदलते तंत्र आणि प्रक्रिया :** मतदान करण्याच्या प्रक्रियेमध्ये कालानुरूप बदल होत गेला आहे. पहिल्या दोन निवडणुकांमध्ये प्रत्येक उमेदवारासाठी वेगळी मतपेटी होती. शिक्का मारलेल्या मतपत्रिका एकाच मतपेटीत टाकण्याची पद्धत 1960च्या दशकात सुरू झाली. त्यानंतर यामध्ये बदल झाला. सन 2004 पासून ईव्हीएम द्वारे मतदानास सुरुवात झाली. मतदान यंत्राद्वारे केलेल्या मतदानाची पडताळणी करण्यासाठी, 2017 नंतर व्हीव्हीपॅटचा वापर सुरू झाला .

1) मतदानप्रक्रियेत अधिक सुलभता आली.
2) निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि मजबूत झाल्याचे दिसून येते.
3) आधुनिक तंत्रज्ञानामुळे अर्थात यंत्रावरील मतदान पद्धतीमुळे निवडणूक प्रक्रियेतील जलद मतमोजणी होऊ लागली.
4) निवडणुकांचे निकाल अत्यंत कमी वेळेत जाहीर होऊ लागले.



Scanned with CamScanner

5) ईव्हिएम वापरामुळे बाद मतांची संख्या कमी झाली.
6) मतपेट्यात खोट्या मतपत्रिका भरणे आदी, गोष्टींना पायबंद निर्माण झाल्याचे दिसून येते.
7) मतपत्रिकांचा साठी वापरण्यात येणाऱ्या लाखो टन कागदाची बचत झाल्यामुळे पर्यावरण पूरकता निर्माण झाल्याचे दिसून येते.
8) कोणत्याही व्यक्तीला कोणतेही निवडणूक पत्रक अगर भित्तीपत्रक छापावयाचे असल्यास नावाशिवाय अर्थात प्रकाशकाचे नाव आणि प्रतींची संख्या छापावी लागते,यामुळे अनिर्बंध छपाई वर बंधन आल्याचे दिसून येते.

**आदर्श आचारसंहिता :**
भारतीय निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्ष - संघटनांना विश्वासात घेऊन सर्व निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता निर्माण केली आहे. न्याय्य व मुक्त राजकीय वातावरणासाठी ती पूरक आणि पोषक ठरल्याचे दिसून येते. टी एन शेषन या आयुक्तांची भूमिका यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचे दिसून येते. निवडणूक आयोग निवडणुकांबाबत जागृती तसेच प्रचार करण्यासाठी समाज माध्यमांचा वापर करण्याची परवानगी देते.

**न्यायव्यवस्थेची सक्रियता :**
भारतीय न्यायव्यवस्थेने निवडणूक आयोगाच्या विविध सुधारणा आणि सक्षमीकरणासाठी नेहमीच सक्रिय सहाय्य केले आहे. उमेदवारांचे गुन्हेगारी पूर्वचरित्र जाहीर करण्याला, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यांच्या वापरास पाठिंबा देणे, संरक्षण खात्यातील मतदार, ज्येष्ठ, दिव्यांग नागरिक यांच्यासाठी मतदान प्रक्रिया सुलभ करण्यासाठी टपाली मतदान व्यवस्थेच्या संकल्पनेला पाठिंबा दिला.पीपल्स युनियन फोर सिव्हिल लिबर्टी विरुद्ध भारत सरकार या खटल्याच्या निकालामध्ये 2013 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर नोटा हा पर्याय सुरू करण्यात आला.

**भारतीय संसदेची भूमिका :**
भारतीय संसदेने निवडणुकीसंदर्भात कायदेशीर तरतुदी आणि आवश्यक कायदे नियम करण्यासाठी आयोगाला नेहमीच पूरक भूमिका घेतल्याची दिसून येते. आधार कार्ड मतदार यादीशी संलग्न करणे, ज्यामुळे दुबार व बनावट मतदारांची नोंदणी टाळता येईल. तसेच वाढत्या महागाईच्या संदर्भात उमेदवारांचा निवडणूक खर्च वाढवणे आदी. संसदेचे निर्णय निवडणूक सुधारणासाठी महत्त्वाचे आहे.

**मतदार जागृती कार्यक्रम :**
भारतीय निवडणुका हा एक प्रकारचा लोकशाहीचा उत्सव असतो, जनमताचे प्रतिबिंब यातून प्रकट होत असते.मतदानाविषयी मतदारांची उदासीनता दूर करण्यासाठी, तसेच नवमतदारांची नोंदणी होण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने सन 2009 पासून SVEEP नावाचा मतदार जागृती कार्यक्रम सुरू केला. यामुळे मतदान टक्केवारी मध्ये काही प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. ऑनलाइन मतदार नोंदणी साठी वोटर हेल्पलाइन NVSP, PWD संकेतस्थळांची निर्मिती केली गेली. चुनाव पाठशाला हा एक असाच मतदार जागृती चा नाविन्यपूर्ण उपक्रम आहे. तसेच शाळा महाविद्यालयातूनही नवमतदार नोंदणी व मतदार जागृती मोठ्या प्रमाणात सुरू केली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये युवकांच्या मनामध्ये राजकीय जागृती निर्माण झाल्याचे दिसून येते.

**नोटा पर्याय (NOTA) :** भारतीय निवडणूक व्यवस्थेत वरील पैकी कोणीही नाही (Non of the Above) हा पर्याय मतदान प्रक्रियेत नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. पीपल्स युनियन फोर सिव्हिल लिबर्टी विरुद्ध भारत सरकार या खटल्याच्या निकालामध्ये 2013 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर नोटा हा पर्याय सुरू करण्यात आला. नकारात्मक मतदानाचा पर्याय देणारा भारत हा जगातील चौदावा देश ठरला आहे. परंतु हा पर्याय नाकारण्याचा अधिकार 'राईट टू रिजेक्ट' देत नाही. राष्ट्रीय निवडणुकांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत विविध प्रमाणामध्ये हा पर्याय वापरला गेला आहे. मात्र त्याच्या यशस्वीतेबद्दल मतमतांतरे आहेत. विविध जनआंदोलनातून ही लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याच्या हक्काबद्दल ही चर्चा झाली आहे. भारतीय निवडणूक आयोगाने गेल्या सात दशकात विविध आव्हानांचा मुकाबला करीत मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक, मुक्त, न्याय्य आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडल्याचे दिसून येते. असे असले तरी निवडणूक यंत्रणेसमोर अजूनही काही जुनी- नवी आव्हाने उभी असलेली दिसून येतात.

**मतदान टक्केवारी चा मुद्दा :** भारताची पहिली सार्वत्रिक लोकसभा निवडणूक सन 1951- 52 मध्ये पार पडली. या निवडणुकीत 17.32 कोटी मतदारांनी मतदान केले. अर्थात एकूण 49 टक्के मतदान झाल्याचे दिसून येते. सन 2019 च्या लोकसभा निवडणुकीचा अपवाद वगळता 65 टक्के पेक्षा अधिक मतदान झाल्याचे दिसून येत नाही. आज पर्यंत 40 ते 60 टक्के लोकच मतदान करतात. यापैकी सर्वात जास्त मते मिळवणाऱ्या उमेदवाराला अनेकदा झालेल्या एकूण मतदानापैकी चाळीस ते पंचेचाळीस टक्के मते पडतात. अर्थात एकूण पात्र मतदारांपैकी वीस पंचवीस टक्के मतदारांनी त्या उमेदवाराला मान्यता दिलेली असते.

**संपत्ती चा वाढता प्रभाव:** अलीकडील काळात निवडणूक प्रक्रिया श्रीमंत- धनवंत व गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडे किंवा लोकांचा प्रभाव वाढल्याचे दिसून येते. धर्मनिरपेक्षता, समाजवाद, आर्थिक विकास आदी अनेक मुद्द्यांबाबत भांडवली पक्षांची जाहीरपणे केली जाणारी भाषणे व आश्वासने यामध्ये आणि प्रत्यक्षातील कारभार व धोरणे यामधील तफावत वाढत गेलेली दिसून येते. सरकारचा कारभार आणि धोरणे भांडवलदार वर्ग, उच्चवर्णीय व पुरुष सत्ता यांना पोषक राहिल्याचे दिसून येते.



Scanned with CamScanner

निवडणुकांमधील संपत्ती, जात, धर्म, प्रदेश आदी. नकारात्मक मुद्द्यांना वगळ देण्यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक बनले असल्याचे दिसून येते.

**उपाययोजना**

**प्रमाणशीर प्रतिनिधित्व :**

सर्व समाज घटकांचे प्रतिनिधी निवडून येण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या निवडणूक पद्धतीचा वापर करायला हवा. या पद्धतीमध्ये उमेदवाराला मत न देता पक्षाला दिले जाते व मतदारसंघाचा आकार बराच मोठा ठेवला जातो. प्रत्येक पक्ष उमेदवारांची यादी प्रसिद्ध करतो. मतदारसंघ मोठे असल्याने लहान पक्षाला ही किमान मते मिळवून प्रतिनिधित्व मिळणे शक्य होते. मतविभागणी मुळे होणारा फायदा मिळवून, मतांवर येणे कुठल्याही पक्षाला या आघाडीला शक्य होत नाही. प्रत्येक नोंदणीकृत पक्षाला जितकी एकूण मते मिळतात, त्या प्रमाणात जागा मिळतात. जगामध्ये याच पद्धतीचा अधिक प्रमाणात वापर केला जातो.

**उमेदवार नाकारण्याचा अधिकार नोटा :** मतदान प्रक्रियेत सध्या उमेदवार नाकारण्याचा ही पर्याय मतदान यंत्रावर दिला गेला आहे. यासाठी मतदारांना वरील पैकी कोणीही नाही (Non of the Above) NOTA हा पर्याय नोंदवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. मात्र यामुळे केवळ मत नोंदवणे या पलीकडे या पर्यायाचा प्रत्यक्षात निवडणुकीवर काहीही परिणाम पडत नाही. म्हणून नोटा पर्यायातून होणाऱ्या मतदानाची प्रक्रिया पुढील प्रमाणे असावी.

1 एकूण उमेदवारांमध्ये अधिक मते मिळवणारा उमेदवार विजयी असेल.

2 नोटा पर्यायाची मते सर्वाधिक असतील तर,

अ) निवडणूक रद्द करून निवडणूक नव्याने घेतली जावी.

ब) रद्द झालेल्या निवडणुकीतील उमेदवारांना पुन्हा निवडणूक लढविण्याचा अधिकार नसावा.

एखाद्या जरी मतदारसंघात अशाप्रकारे सर्व उमेदवार नाकारले गेले व पुन्हा निवडणूक घ्यावी लागली तर राजकीय पक्षांना याची गंभीर दखल घ्यावी लागेल व उमेदवार निवडीबाबत पारदर्शक व काटेकोर धोरण अवलंबावे लागेल.

**उमेदवार परत बोलावण्याचा अधिकार : (Right to Recall)**

मतदान केल्यानंतर पाच वर्षे मतदारांच्या हातात काहीच नियंत्रण राहत नाही. यासाठी एकूण जेवढे मतदान झाले आहे त्याच्या पन्नास टक्के लोकांनी मागणी केल्यास निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधीस परत बोलावण्याचा अधिकार लोकांना दिला पाहिजे.

**निवडणुकीतील खर्च व पारदर्शकता :** निवडणूक प्रक्रियेतील प्रचंड पैशाचा वापर हा आजच्या निवडणूक प्रक्रियेतील एक गंभीर मुद्दा झाला आहे राजकीय पक्षांना बिल्डर, व्यापारी, उद्योजक आदींकडून निवडणुकीविषयी प्रचंड निधी मिळतो. त्यामुळे राजकीय पक्ष उमेदवारांना मोठ्या प्रमाणामध्ये निधी पुरवतात. निवडणूक खर्चावर आयोगाचे बंधन असले तरी त्यामधून ही पळवाटा काढल्या जातात. यावर कठोर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे बंधनकारक केले पाहिजे. उमेदवारांच्या खर्चाचे ऑडिट काटेकोरपणे केले जावे. तसेच प्रत्येक उमेदवाराचा निवडणूक प्रचाराचा खर्च आयोगाने मर्यादित स्वरूपात करावा.

**गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या वर नियंत्रण :** गेल्या काही वर्षात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकप्रतिनिधींचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे दोन वा त्याहून अधिक वर्षे तुरुंगवासाची शिक्षा देण्यास पात्र ठरणाऱ्या गुन्ह्यातील आरोपी उमेदवारास उमेदवारी देऊ नये. राजकीय व दिवाणी गुन्हे सोडल्यास, इतर फौजदारी गुन्हे बलात्कार, खून, खंडणी आदी गुन्हे असणाऱ्या व्यक्तींना निवडणूक लढविण्यास बंदी असावी. मालमत्ता व गुन्हेगारी यासंबंधी खोटी माहिती देणाऱ्यास निवडणुकीस बंदी केली जावी

निष्कर्ष : सध्या जगभरातील लोकशाही व्यवस्थाधोक्यात आलेल्या दिसतात.लोकशाही मूल्यांना आव्हान दिले जात आहे. परिणामी लोकशाही व्यवस्था ढासळून त्यांची जागा हुकुमशाही अथवा आभासी लोकशाही घेत आहे. भारताबरोबर स्वतंत्र झालेल्या जगभरातील व्यवस्थांना अनेकविध धोके निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. सातत्याने विकसित होणाऱ्या विराट तंत्रज्ञानाने लोकशाही मुठभरांच्या हातात केन्द्रित होत आहे. मात्र भारतीय लोकशाही टिकणे आणि तिची वृद्धी होणे याचे यश निवडणूक आयोगाला द्यावे लागेल. गेल्या सात दशकापासून हे सिद्ध झाल्याचे दिसून येते. आयोगाने अधिक सक्षम आणि उत्तम यंत्रणाद्वारे प्रत्येक निवडणुकीत निर्माण झालेल्या आव्हानावर मात केल्याचे दिसून येते. भारतासारख्या जगातील मोठ्या लोकशाहीत निवडणूक यंत्रणा राबविणे आव्हानात्मक होते आणि आहे. अलीकडील कोरोना महामारीतही आयोगाची कार्यतत्परता दिसून आली. आयोगाने कोरोना प्रोटोकॉल यशस्वीरीत्या विकसित केल्याचे गेल्या दोन वर्षात अनेक निवडणुकांमध्ये दिसून आले.

संदर्भग्रंथ सूची :

1.www.eci.com ( Election Commission of India)

2.डॉ.पवार दिपक (संपा),'लोकशाही समजून घेताना' मुख्य निवडणूक अधिकारी, कार्यालय,महाराष्ट्र 14 फेब्रुवारी 2022.

3.भारतीय राज्यव्यवस्था सुधा पब्लिकेशन्स ,आग्रा ,2019

4 पाटील वा.भा.,'भारतीय राज्यघटना',भाग-2,प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 2012

5 साळुंखे विजय,(लेख).दै.सकाळ,8 मार्च, 2022



प्रा.डॉ.करीम नबी मुल्ला

Scanned with CamScanner